# अमरावती जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा, संकुलाच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या कार्य प्रणालीचे चिकीत्सक अध्ययन

शोधकर्ता
**डॉ. सचिन सुरेश महल्ले**
एम.पी.एड,पी.एचडी.

**प्रस्तावना :–**

१९५६ मध्ये भाषावर प्रांत रचना झाली. द्वीभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, त्यामुळे शिक्षणाला नवा आशय प्राप्त झाला प्राथमिक व उच्च शिक्षणाच्या प्रसारास गती येवून शारीरीक शिक्षणालाही शिक्षणाचा अविभाज्य अंग म्हणून अंतर्भाव करण्यात आले. शारीरीक शिक्षणाला महत्वाचे स्थान १९३७ साली प्राप्त झाले होते १९३७ मध्ये राज्याची सुत्रे लोक नियुक्त मंडळाकडे प्रथमच सोपविण्यात आली. कै.श्रीयुत बी.जी.खेर ह्यांनी राज्याचे पहिले मुख्य व शिक्षणमंत्री म्हणून राज्याची सर्व सुत्रे आपल्या ताब्यात घेतली, त्यांची शारीरीक शिक्षणाबद्दल आस्था वाखाणऱ्या जोगी होती अधिकार सुत्रे हाती घेतल्या बरोबर शारीरिक शिक्षण आणि योग विद्येतील तज्ञ कै. स्वामी कुवल्या नंदजी यांच्या अध्यक्षतेखाली शारीरिक शिक्षणाच्या विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी एक तज्ञांची समिती नेमली त्या समितीने आपला अहवाल थोड्या कालावधीत शासनास शिफारशी केल्या होत्या.

१) शारीरिक शिक्षण हे सामान्य शिक्षणाचे एक अविभाज्य अंग असावे. शारीरिक शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांचा साध्य करण्याचा प्रयत्न व्हावा.
२) शारीरिक शिक्षण प्रशिक्षणा करीता एक स्वतंत्र संस्था शासनाने सुरू करावी.
३) शिक्षण प्रशिक्षणाचे काम वेगाने व्हावे. म्हणून अल्प मुदतीचे शारीरिक शिक्षण प्रशिक्षणाचे वर्ग सुरू करावे.
४) ज्यामध्ये व्यायाम खेळ यांना प्राधान्य राहिल, अशा शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम सर्व शाळातून सक्तीने सुरू करावा.
५) भारतीय व्यायामांच्या संस्थांना मान्यता देऊन त्यांच्या करीता स्वतंत्र पद्धत सुरू करावी.
६) शारीरिक शिक्षण पर्यवेक्षणा करीता स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.
अ) इ.स. १९३८ पासून शारिरीक शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व कार्यकर्ते यांचे शासनाला शारिरिक शिक्षणाच्या विकासासाठी एक सल्लागार मंडळ नेमले.
ब) पदवीधरा करिता एक वर्षाचे शारीरिक शिक्षण क्रम शिकविण्यासाठी शासकीय प्रशिक्षण संस्था कांदिवली मुंबई उपनगर येथे सुरू केली.
क) प्राथमिक व माध्यमिक शाळा शिक्षणाकरिता आठ ते दहा आठवड्याचे शारीरिक शिक्षण प्रशिक्षणाचे उद्बोधन वर्ग सुरू केले.
ड) प्राथमिक व माध्यमिक शाळातुन तसेच महाविद्यालयांच्या पहिल्या दोन वर्षासाठी शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रम तयार करून तो सक्तीचा केला.

ई) शाळामध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक नेमले वेळा पत्रकात शारीरिक शिक्षणा करीता तासिका राखून ठेवले व क्रीडांगणे व क्रीडासाहित्य आदी शारीरिक व्यवस्थापना बाबत योग्य ते नियम करून शारीरिक शिक्षणाकरीता अनुदान पद्धती सुरू केली.

फ) शाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी संबंधी शाळांना आदेश दिले.

य) व्यायाम शाळाना मान्यता देऊन त्यांच्या करीता अनुदान पद्धती सुरू केली.

र) शारीरिक शिक्षणाच्या पर्यवेक्षणाकरीता विभागीय पातळीवर प्रत्येक विभागात दोन असे पर्यवेक्षक शारीरिक शिक्षणाचे नेमले.

इ.स. १९७० मध्ये शिक्षणमंत्री मा.श्री मधुकरराव चौधरी यांनी मार्गदर्शन धोरण तयार केले. शिक्षण पद्धतीतून बौद्धिक विकास होत असतांना व्यक्ती निष्ठा राष्ट्रीय उद्दीष्टांची व आकांक्षाशी आणि जागतिक परिस्थिती मधील अहवानांशी सुसंगत राखण्यासाठी हे धोरण आखले गेले. गुणवत्ता वृध्दीच्या कार्यक्रमात कार्यानुभव, समाजसेवा शिक्षण, खेळ व क्रीडा व युवक कल्याण ह्या विषयांचे कार्यक्रम सर्व स्तरावर विकसित करण्याकडे व राबविण्यात विशेष लक्ष पुरवावे असा उल्लेख आहे. तसेच खेळ व क्रीडा क्षेत्रात विशेष आकर्षण असलेल्या मुलांचा शोध आणि विकास करण्यास उपाय योजिले जातील याचा ही उल्लेख आहे. या कार्याची व्याप्ती सुव्यवस्थित रीतीने सांभाळण्यासाठी इ.स. १९७० मध्ये स्वतंत्र क्रीडा व युवक सेवा विभाग आणि संचालनालय स्थापन करावे लागले.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरणानुसार (१९९६) जिल्हयाच्या ठिकाणी विविध खेळाडूंच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आणि जिल्हा क्रीडा संकुलांची स्थापना करण्यात आली. ह्या जिल्हा क्रीडा संकुलामध्ये एक जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याची नेमणुक करण्यात आली. आणि विविध खेळाच्या सुविधा साहित्य प्रशिक्षणांच्या सोई उपलब्ध करून देण्यात आल्या, परंतु त्यांच्या कार्यप्रणाली दोषपुर्ण असल्याचे शोधकर्त्याला वाटत होते. कारण ज्या उद्देशामुळे ही जिल्हा क्रीडा संकुलाची स्थापना करण्यात आली ते उद्देश प्राप्त होत नव्हते म्हणून शोधकर्त्याने ही समस्या अध्ययनासाठी निवडली होती. शोधकर्त्याने अशी परिकल्पना केली हाती की जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा संकुलाची कार्य प्रणाली समाधान कारक नाही.

परिकल्पना म्हणजे शोधकार्याचे अनुमानित निष्कर्ष परिकल्पने मुळे शोध कर्त्याला शोध कार्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहचण्यास मदत होते. ह्या ठिकाणीही शोधकर्त्याने अशी परिकल्पना केली होती की "अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी क्रीडा संकुलाची कार्य प्रणाली समाधान कारक नाही."

**संशोधन कार्य पध्दती :-**

अमरावती जिल्हयाच्या क्रीडा संकुलाच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या कार्य प्रणालीचे चिकित्सक अध्ययन करण्याचे असल्यामुळे शोधकर्त्याने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली होती त्या करीता शोधकर्त्याने प्रश्नावली तयार केली होती व त्या प्रश्नावली चे उत्तर प्राप्त करण्याकरीता शोधकर्त्याने अमरावती जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या कार्यलयात क्रीडाअधिकाऱ्याची मुलाखात घेतली व खालील प्रश्नाची उत्तरे प्राप्त केलीत. प्रश्नावली खालील प्रमाणे होती.

**प्रश्नावली:-प्रश्न:**

१) जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या कक्षेत कोणकोणते कार्य येतात ?

२) जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या अंतर्गत किती क्षेत्रफळ जागा आहे?

३) क्रीडा मैदाने आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय दर्जाचे आहेत काय?

४) मैदानाची निगा राखली जाते काय?

५) जिल्हा क्रीडा अधिकारी क्रीडा संकुलात कोणकोणत्या खेळांची स्पर्धांचे आयोजन करतात?

६) जिल्हा क्रीडा अधिकारी क्रीडा शिबीरांचे आयोजन करतात काय?

७) खेळ शिबीरांच्या आयोजनाचा खर्च शासना कडून प्राप्त होतो काय?

८) विविध खेळाचे शासनाद्वारे नियुक्त केलेले प्रशिक्षक आहेत काय?

९) जिल्हा क्रीडा संकुलात भरपूर पाणी आणि विज पुरवठा उपलब्ध आहे काय?

१०) जिल्हा क्रीडा संकुलात तयार झालेल्या खेळाडूंनी कोणकोणत्या खेळात राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळविले व त्यांना पदके प्राप्त झालीत?

११) क्रीडा संकुलाद्वारे खेळ साप्ताहिकांचे प्रकाशन केले जाते काय?

१२) केले जात असल्यास कोणत्या नावाने प्रकाशित होते?

१३) क्रीडा संकुलात खेळाडूंना विनामूल्य प्रवेश दिल्या जातो काय?

१४) प्रवेश शुल्क आकारण्यात येत असल्यास कोणत्या आकारात शुल्क आकारण्यात येते ? साप्ताहिक, मासिक, त्रिमाही की वार्षीक?

१५) जिल्हाक्रीडा अधिकाऱ्याच्या अधिकारी खाली कोणकोणती कार्य येतात?

जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याची स्वाक्षरी

दिनांक : नाव :

जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यापासुन प्रश्नावली ची उत्तरे शोधकर्त्याने स्वत: मुलाखत घेऊन प्राप्त केलीत व त्याचे विश्लेषण करून खालील तालिकेत दिले आहे.

**तालिका न. : १**

| क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या कार्यालयातील कार्य | जिल्ह्यातील सर्व क्रीडा स्पर्धांचे आयोजन बांधकाम व्यवस्थापन, अनुदान योजना जिल्ह्यात क्रीडा सुविधांची निर्मिती, विविध खेळ व क्रीडांचा प्रचार व प्रसार क्रीडा व खेळाप्रती वातावरण निर्मिती |
| २. | क्रीडा संकुलाची जागा | उपलब्ध आहे. |
| ३. | मैदानाची निगा | राखली जाते. |
| ४. | क्रीडा मैदाने | राष्ट्रीय दर्जाचे आहे. |
| ५. | स्पर्धांचे आयोजन करतात काय? | शालेय, तालुका व राष्ट्रीय स्तरावर स्पर्धांचे व शासनमान्य सर्व क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन स्पर्धांचे दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या पुस्तीके प्रमाणे करण्यात येते. |
| ६. | जिल्हा क्रीडा संकुलात क्रीडा | शिबीरांचे आयोजन करण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करता काय? | |
| ७. | शिबीरांच्या आयोजनार्थ वित्तीय सहाय्यता कोठून प्राप्त होते. | मा. आयुक्त क्रीडा व युवक संचालनालय युवक संचालक पूणे कडून प्राप्त होते. |
| ८. | संकुलात पाणी पुरवठा आणि विजपुरवठा भरपुर आहे काय? | संकुलात पाणी पुरवठा व विज पुरवठा भरपुर मात्रावर उपलब्ध आहे. |
| ९. | शासकीय क्रीडा प्रशिक्षक संकुलात आहेत काय? | शासकीय प्रशिक्षक उपलब्ध आहे. |
| १०. | जिल्हा क्रीडा संकुलातील खेळाडूंनी कोणकोणत्या खेळात व क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळविले आहे? | फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, हॅण्डबॉल मैदानी स्पर्धा टेबल टेनिस, बॉक्सींग, आर्चरी, वेटलिफटींग, खो–खो, कुस्ती.इत्यादी |
| ११. | खेळ संबधित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येते काय? | वार्षिक खेळ व क्रीडे संबंधित पुस्तकाचे प्रकाशन केले जाते. |
| १२. | क्रीडा संकुलात प्रवेश शुल्क आकारण्यात येतो काय? | विनामुल्य प्रवेश देण्यात येतो. |
| १३. | प्रवेश शुल्क | मासिक प्रवेश शुल्क आकारण्यात येतो. |
| १४. | क्रीडा अधिकाऱ्याचे कोणकोणते कार्य येतात. | क्रीडा संकुलात विविध क्रीडा सुविधांचे बांधकाम, बांधकाम व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राचे व्यवस्थापन, इतर कार्यालयीन कामे इत्यादी. |
| १५. | प्रशिक्षण क्रीडा शिबीरात खेळाडूंची निवड पात्रते नुसार केली जाते काय? | खेळाडूंची निवड पात्रते नुसार केली जाते. |

स्त्रोत :– जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या मुलाखती वरून.

**स्पष्टीकरण** :–तक्ता क्रमांक १ वरून असे स्पष्ट होते की अमरावती जिल्हा संकुलाच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांची कार्य प्रणाली समाधान कारक आहे म्हणून शोधकर्त्याने जी परिकल्पना केली होती की जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याची कार्य प्रणाली समाधान कारक नाही ही परिकल्पना स्विकारण्यात येत नाही.

**निष्कर्ष** :– या शोध कार्यावरून शोधकर्त्याने असे निष्कर्ष काढले आहे की, अमरावती जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याची कार्य प्रणाली समाधान कारण आहे.

**संदर्भ** :–

१. महाराष्ट्र राज्याचे क्रीडाधोरण, २००१ महाराष्ट्र स्पोर्टस इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपमेन्ट प्लॅन अंतर्गत क्रीडा सुविधा निर्माण करणे.
2. क्रीडा सुविधांची निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य योजना शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडा धो. २०१२/प्र.क्र.२६०/क्री.यु.स.–१ दि.०१–०३–२०१४.